# पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर

''पोलीस शिपाई भरती – 2019''

# –: उमेदवारांसाठी सुचना :–

- पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या 271 ''पोलीस शिपाई''पदासाठी तात्पुरत्या निवडसूची व तात्पुरत्या प्रतिक्षासुची मध्ये समाविष्ठ असलेल्या उमेदवारांना दि. 12/03/2022 रोजी मुळ प्रमाणपत्र/कागदपत्राच्या पडताळणी करीता बोलाविण्यात आले होते. मुळ कागदपत्रांची पडताळणी तसेच उमेदवारांनी दि.11/03/2022 पर्यन्त सादर केलेल्या आक्षेप/हरकती विचारात घेउन भरती निवड मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार अंतीम निवडसूची व अंतीम प्रतिक्षासूची प्रसिध्द करण्यात येत आहे

- प्रवर्गनिहाय/समांतर आरक्षणा अंतर्गत अंतीम निवडसुची व अंतीम प्रतिक्षासुची मधील उमेदवारांची निवड ही त्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची/कागदपत्रांची संबंधीत विभागाकडून पडताळणी, चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय तपासणीतील पात्रतेच्या आधीन राहून करण्यात आलेली आहे. सदर पडताळणीमध्ये संबंधीत विभागाकडून काही आक्षेप घेण्यात आल्यास/वैद्यकीय तपासणीत/चारित्र्य पडताळणीत अपात्र ठरल्यास किंवा उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेमध्ये गैरप्रकार केला होता असे भविष्यात निष्पन्न झाल्यास निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्याचा अधिकार पोलीस भरती निवड मंडळास आहे. यासंबंधात उमेदवारांचा कोणताही दावा/तकार/हक्क राहणार नाही, याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

- सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने अंतीम निवडसूची व अंतीम प्रतिक्षासूची पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या www.mahapolice.gov.in आणि नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या www.nagpurpolice.gov.inया संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक :– 22/03/2022
स्थळ :– नागपूर शहर

22/3/22

( डॉ.संदिप पखाले )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे करिता.